## आजचे पंचांग

आज तारखेनुसार
छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे
गुरुवार १९ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतु, माघ मास, कृष्णपक्ष,
द्वितीया दुपारी ३-५९ पर्यंत
दिवस नक्षत्र– पूर्वाभाद्रपदा

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४७ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### लग्नात १० कोटी रुपयांचा पाऊस?

**चंदीगड :** पंजाबमधील तरनतारन येथील एका लग्नाचा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये वर आणि अनेक पाहुणे वधूवर कोट्यवधी रुपयांच्या नोटांचा वर्षाव करत आहेत, जोपर्यंत डान्स फ्लोअर रोख रकमेच्या कार्पेटखाली गाडला जात नाही. या व्हिडिओ क्लिपमुळे ऑनलाइन वादग्रस्त दाव्यांना खतपाणी मिळाले आहे, काही वापरकर्त्यांनी लग्नादरम्यान तब्बल १० कोटी रुपयांचा वर्षाव झाल्याचा आरोप केला आहे. एका डीजे मालकाने सोशल मीडियावरील या अटकळीला अतिशयोक्ती म्हणून फेटाळून लावले.

### जाहिरातींवर ४५२ कोटींचा खर्च

**गुवाहाटी :** आसाम सरकारने गेल्या पाच वर्षांत विविध प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, सोशल आणि डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे जाहिरातींमध्ये सुमारे ४०० कोटी रुपये खर्च केले आहेत, असे एका मंत्र्यांनी विधानसभेत सांगितले. २०२१-२२ पासून बॅनर, होर्डिंग्ज इत्यादींवर आणखी ५२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, अशी माहिती माहिती आणि जनसंपर्क मंत्री पिजुष हजारिका यांनी दिली.

### बेंगळुरूत तीन खंडणीखोरांना अटक

**बेंगळुरू :** एका स्पा मालकाचे अपहरण करून २ लाख रुपयांची खंडणी मागितल्याच्या आरोपाखाली तीन जणांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. बेगूर येथील अक्षयनगर येथील एका स्पाच्या व्यवस्थापकाने इलेक्ट्रॉनिक सिटी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. आरोपींनी पीडितेला त्यांच्यापैकी एकाने अपार्टमेंटच्या निधीतून गैरव्यवहार करून नंतर ऑनलाइन गेमिंगमध्ये हरवलेले पैसे परत मिळवण्यासाठी लक्ष्य केले.

## आमदार रोहित पवार यांचा पुन्हा एकदा गंभीर आरोप

# इन्शुरन्ससाठी दादांचे विमान पाडले?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर शंका उपस्थित करत हा अपघात नसून घातपात असू शकतो, असा दावा केला आहे. नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी काही नवीन आणि गंभीर माहितीच्या आधारे तांत्रिक मुद्द्यांचा उल्लेख करत घातपाताचा संशय दृढ झाल्याचे सांगितले आहे.

रोहित पवार म्हणाले की, २७ तारखेला घडलेल्या काही घटनांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या दिवशी काही व्यक्तींची भेट, आलेले फोन कॉल्स आणि त्यानंतर



घडलेली घटना यामध्ये संबंध असू शकतो का?, याचा तपास होणे गरजेचे आहे.

रोहित पवारांच्या मते समोर येत असलेली माहिती पाहता हा केवळ अपघात नसून नियोजनबद्ध कारवाई असण्याची शक्यता नाकारता येत नाही.विमानाच्या खरेदीविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, हे विमान मूळ ३५ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले होते. मात्र त्याची सध्याची स्थिती आणि इंजिनची गुणवत्ता पाहता आज त्याची बाजारातील किंमत जास्तीत जास्त १० ते १५ कोटी रुपये असू शकते. काही तज्ज्ञांच्या मते आणि ज्यांनी हे विमान पूर्वी चालवले, त्यांच्या मते तर १० कोटींनाही ते घेणे योग्य ठरले नसते, असे त्यांनी नमूद केले. रोहित पवारांनी इन्शुरन्स संदर्भात मोठा मुद्दा उपस्थित केला आहे. विमानाची इन्शुरन्स व्हॅल्यू सुमारे ५५ कोटी रुपये होती. मात्र 'लायबिलिटी इन्शुरन्स' तब्बल २१० कोटी रुपये असल्याचे त्यांनी सांगितले.या रकमेचा समावेश विमानात बसलेले लोक, विमान एखाद्या घरावर किंवा प्राण्यांवर पडले तर होणारे नुकसान, या सर्वांचा समावेश होतो. याशिवाय २१० कोटी रुपयांच्या एकूण विमा रकमेपैकी मुख्य पायलटला किती रक्कम मिळाली असती, ही माहिती त्यांना होती का, आणि प्रत्यक्षात ही रक्कम मिळणार होती का, २१० कोटींच्या इन्शुरन्ससाठी अजित दादांचे विमान पाडले का? याबाबत स्पष्टता आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

### या प्रकरणाचा तपास देशाबाहेर का?

● केंद्रीय मंत्री राममोहन नायडू यांनी ९० कोटी रुपये खर्चून आधुनिक तपास प्रयोगशाळा सुरू केल्याचे सांगितले जाते. मग या प्रकरणाचा तपास देशाबाहेर का पाठवला जात आहे? भारतात उपलब्ध तांत्रिक साधनांचा वापर का केला जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विमानातील इंधन टाकीबाबतही त्यांनी संशय व्यक्त केला. अतिरिक्त इंधन टँक ठेवण्यात आले होते का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

## पुणे पालिकेतील मिळकतकर वाढीचा प्रस्ताव फेटाळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने सुचविलेली मिळकतकरातील पाच टक्के वाढ सर्वसाधारण सभेत बुधवारी फेटाळण्यात आली. त्यामुळे पुणेकरांवरील संभाव्य करवाढ टळली आहे. निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या भाजपकडून पहिल्याच वर्षी करवाढ होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता.

महापालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तयारी सुरू असून, २० फेब्रुवारीपूर्वी मिळकतकराबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

दोन आठवड्यांपूर्वी प्रशासक म्हणून कार्यभार सांभाळताना आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मिळकतकरात पाच टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला.

महापालिकेने गेल्या दहा वर्षांत मिळकतकरात वाढ केलेली नाही. उत्पन्न आणि खर्च यामधील वाढती तफावत लक्षात घेता करवाढ आवश्यक असल्याचे आयुक्त राम यांनी मांडले होते.

प्रशासनाने सुरुवातीला दहा टक्के वाढ सुचविली होती; मात्र स्थायी समितीत ती कमी करून पाच टक्क्यांवर आणण्यात आली होती. चार वर्षांनंतर महापालिकेतील प्रशासक राज संपुष्टात येऊन लोकप्रतिनिधी सभागृहात परतले आहेत. अशा परिस्थितीत करवाढीचा निर्णय घेतल्यास त्याचे राजकीय परिणाम सत्ताधारी भाजपाला भोगावे लागतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव बहुमताने फेटाळण्यात आला.

## महसूल विभागाला बळकटी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील महसूल विभागावरील वाढता कामाचा ताण आणि लोकसंख्येची वाढ लक्षात घेऊन राज्य मंत्रिमंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रशासकीय कामकाज अधिक सुसूत्र आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी राज्यात ११ नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये तसेच ६९ अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरिकांना जिल्हा किंवा तालुका मुख्यालयापर्यंत जाण्याची गरज कमी होणार असून, महसूल विषयक सेवा अधिक वेगाने उपलब्ध होतील, असा सरकारचा दावा आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांचा भौगोलिक विस्तार मोठा असून काही तालुके जिल्हा मुख्यालयापासून लांब अंतरावर आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे महसूल विभागावर ताण वाढला होता. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

पुणे विभागात सर्वाधिक तीन अतिरिक्त जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्यात येणार आहेत, तर इतर विभागांमध्ये प्रत्येकी एक पद निर्माण होईल. विशेषतः पुणे जिल्ह्यातील बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात येणार असून, खेड तालुक्यातील चाकण येथे अतिरिक्त तहसीलदार कार्यालय सुरू होणार आहे. संबंधित क्षेत्रातील तालुक्यांची संख्या, एकूण लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, आदिवासी व दुर्गम भागातील गरजा, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर तसेच तालुक्यातील सर्वात दूरच्या गावाची स्थिती यांचा विचार करण्यात आला आहे.

## कच्च्या तेलातील घट ठरले मुख्य कारण; अमेरिकेच्या भूमिकेचा परिणाम

# रशियाकडून भारताच्या तेल आयातीत घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत आणि रशिया यांच्यातील व्यापारी संबंधांमध्ये अलीकडे लक्षणीय बदल होत असल्याचे चित्र समोर आले आहे. सोमवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, जानेवारी २०२६ मध्ये रशियामधून भारताच्या माल आयातीत तब्बल ४०.४८ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे.

जानेवारी २०२५ मध्ये रशियाकडून भारताची आयात सुमारे ४.८१ अब्ज डॉलर्स इतकी होती. ती जानेवारी २०२६ मध्ये घसरून २.८६ अब्ज डॉलर्सवर आली आहे. या घसरणीमागे रशियन कच्च्या तेलाच्या खरेदीत



झालेली मोठी घट हे प्रमुख कारण असल्याचे मानले जात आहे. रशियाकडून होणाऱ्या एकूण आयातीपैकी सुमारे ८० टक्के वाटा कच्च्या तेलाचा आहे.

तज्ज्ञांच्या मते, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या जादा शुल्क आणि कठोर भूमिकेचा परिणाम भारतीय रिफायनरीजच्या खरेदी धोरणांवर झाला आहे. अमेरिकेकडून भारतीय उत्पादनांवर प्रथम २५ टक्के आणि त्यानंतर अतिरिक्त २५ टक्के, असा एकूण ५० टक्क्यांपर्यंत शुल्काचा दबाव निर्माण करण्यात आला होता.

अमेरिकन प्रशासनाकडून दबाव सुरू झाल्यानंतरही एप्रिल २०२५ मध्ये रशियामधून भारताची तेल आयात ४.७३ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. मात्र त्यानंतर परिस्थितीत बदल झाला. सप्टेंबर २०२५ मध्ये रशियन तेल आयात एप्रिलच्या तुलनेत सुमारे ३० टक्क्यांनी घटून ३.३२ अब्ज डॉलर्सवर आली.

प्रमुख खासगी रिफायनर रिलायन्स इंडस्ट्रीज यांनी जानेवारी महिन्यात रशियन क्रूडची नियोजित डिलिव्हरी न झाल्याची पुष्टी केली आहे. यावरून भारतीय कंपन्यांनी पुरवठा साखळीत पर्याय शोधण्यास सुरुवात केल्याचे संकेत मिळत आहेत. कच्च्या तेलाव्यतिरिक्त भारत रशियाकडून कोळसा, कोक, काही पेट्रोलियम उत्पादने, खते, लोखंड, न्यूजप्रिंट, प्रकल्प साहित्य, डाळी, मोती तसेच मौल्यवान आणि अर्ध-मौल्यवान दगडांची आयात करतो. मात्र सध्या तेल आयातीतील घटेमुळे एकूण व्यापारमूल्यावर मोठा परिणाम झाला आहे. अंतरिम करारामुळे काही प्रमाणात शुल्क दिलासा मिळाला असला तरी, भारतीय रिफायनर्स पर्यायी स्रोतांकडे वळत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रशियाकडून सवलतीच्या दरात होणारी आयात कमी होणे, अमेरिकेसोबतचे बदलते व्यापार समीकरण आणि जागतिक राजकीय दबाव यांचा एकत्रित परिणाम भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर आणि व्यापार धोरणांवर होत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदविले आहे.

# वाहतूकदारांचे ५ तारखेपासून राज्यव्यापी आंदोलन

## ई-चलन प्रणालीविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मोटार वाहन आणि पोलिस विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या ई-चलन प्रणालीविरोधात राज्यातील वाहतूकदारांनी ५ मार्चपासून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. जबरदस्ती दंड आकारणी करून वाहनधारकांची नियमबाह्य लूट केली जात असल्याचा आरोप करत महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स कृती समितीने हा निर्णय जाहीर केला. या आंदोलनात ट्रक, टेम्पो, खाजगी ट्रॅव्हल्स, ऑटो, टॅक्सी तसेच शालेय बस चालक सहभागी होणार असल्याने मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता आहे. शालेय विद्यार्थ्यांनाही याचा फटका बसू शकतो.

केंद्र सरकारने १ ऑक्टोबर २०२० पासून मोटार वाहन कायदा कलम २११ अ तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम १६४, १६५, १६७ आणि १७ ऑगस्ट २०२० पासून १६७ अ लागू केले आहेत. या तरतुदीनुसार ई-चलन जारी करताना विशिष्ट प्रक्रिया पाळणे बंधनकारक आहे. मात्र पोलिस व परिवहन विभाग या प्रक्रियेचे पालन करत नसल्याचा आरोप वाहतूकदारांनी केला आहे.

वाहतूकदारांच्या मते, ई-चलन देण्यासाठी वापरली जाणारी उपकरणे मान्यताप्राप्त नसतात. चलन जारी केल्यानंतर तात्काळ संदेश पाठविला जात नाही. अधिकाऱ्यांना विधिवत प्राधिकृत न करता ई-चलन दिले जाते. उपकरणांचे कॅलिब्रेशन होत नसल्याचा तसेच पुरावा कायद्यानुसार आवश्यक पुरावे नसताना दंड आकारला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. गुन्ह्याचे छायाचित्र अस्पष्ट असतानाही दंड वसूल केला जातो, अशीही तक्रार आहे.

वाहनधारकांना न्यायालयात प्रकरण चालविण्याची संधी दिली जात नसल्याचा आरोप समितीने केला आहे. प्रकरणे तीन किंवा सहा महिन्यांच्या आत न्यायालयात दाखल होत नाहीत. पुरेशी न्यायालये उपलब्ध नसल्याने नागरिकांचा संरक्षणाचा हक्क बाधित होत असल्याचे सांगण्यात आले. जानेवारी २०२६ मधील सुधारणांनुसार ४५ दिवसांत दंड न भरल्यास वाहन जप्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे न्यायालयीन प्रक्रियेचा हक्क कमी झाल्याचा दावा वाहतूकदारांनी केला आहे. विविध मागण्यांवर सात दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास ५ मार्चपासून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स कृती समितीचे संयोजक प्रसन्न पटवर्धन यांनी दिला आहे.

### ११ बांगलादेशी महिला पोलिसांच्या ताब्यात

**पुणे :** शहराच्या मध्यवर्ती बुधवार पेठ परिसरात पुणे पोलिसांनी राबवलेल्या विशेष कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान ११ बांगलादेशी महिलांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत एकूण २२ महिलांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.
अवैध वास्तव्य आणि बेकायदेशीर हालचालींबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे फरासखाना आणि खडक पोलीस ठाण्यांनी संयुक्त शोधमोहीम हाती घेतली होती. त्यानंतर बुधवारी रात्री कारवाई करण्यात आली. संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या महिलांची चौकशी केली असता त्यापैकी ११ महिला बांगलादेशी असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

# पोर्श प्रकरणातील आरोपीला जामीन

## सहआरोपींना जामीन मिळाल्याने दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२४ मधील पुणे पोर्श अपघात प्रकरणात मुख्य आरोपीच्या रक्तनमुन्यात छेडछाड केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या अश्पक मकांदर यांना सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी जामीन मंजूर केला. समान आरोप असलेल्या सहआरोपींना यापूर्वी जामीन मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर हा दिलासा देण्यात आला.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर सुनावणीदरम्यान न्यायालयाने विचारले की, आरोपी किती काळापासून तुरुंगात आहे.



त्यावर मकांदर यांच्या वतीने हजर वरिष्ठ वकील सिद्धार्थ अग्रवाल यांनी "२० महिने" असे उत्तर दिले. त्यानंतर न्यायालयाने "समतेच्या आधारावर जामीन देत आहोत" असे नमूद करत जामीन मंजूर केला. खंडपीठाने एसएलपी (फौजदारी) क्रमांक १२७०/२०२६ मधील आदेशाचा संदर्भ देत सहआरोपी अमर संतोष गायकवाड यांना जामीन मंजूर केल्याचे नमूद केले. गायकवाड यांच्यावर रक्तनमुना बदल प्रकरणात मध्यस्थ म्हणून भूमिका बजावल्याचा आरोप आहे. १९ मे २०२४ रोजी पहाटे पुण्यातील कल्याणी नगर परिसरात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने कथितपणे दारूच्या नशेत चालवलेल्या पोर्श कारने दुचाकीला धडक दिली होती. या अपघातात मध्य प्रदेशातील २४ वर्षीय सॉफ्टवेअर अभियंते अनिश अवधिया आणि अश्विनी कोष्टा यांचा मृत्यू झाला.

अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल यांनी पत्नी व इतर सहकाऱ्यांसह रुग्णालयातील डॉक्टरांशी संगनमत करून रक्त तपासणी अहवालांमध्ये फेरफार केल्याचा आरोप आहे. अल्कोहोलचे अंश दिसू नयेत यासाठी रक्तनमुने बदलण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

## शासनाचा सुधारित निर्णय जाहीर; विरोधकांकडून टीकेची झोड

# मुस्लिम समाजाचे ५ टक्के आरक्षण अधिकृतपणे रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत मुंबई राज्य सरकारने मुस्लिम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण अधिकृतपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय फेब्रुवारी २०२६ मध्ये प्रकाशित करण्यात आला असून, त्यामध्ये संबंधित सर्व आदेश, परिपत्रके तसेच जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रियेवर स्थगिती देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

२०१४ मध्ये तत्कालीन काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने अध्यादेशाद्वारे



सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास मुस्लिम गटांना 'विशेष मागास प्रवर्ग-अ' अंतर्गत शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. त्यावेळी मराठा समाजालाही १६ टक्के आरक्षण देण्यात आले होते. या निर्णयामुळे राज्यातील एकूण आरक्षणाची टक्केवारी ७३ टक्क्यांवर पोहोचली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालय यांनी या आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर झाले नाही. त्यामुळे हा निर्णय प्रत्यक्षात अंमलात येऊ शकला नाही. गेल्या १२ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर आता देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने अंतिम निर्णय घेतला आहे. शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, २०१४ चा अध्यादेश कायद्यात परिवर्तित न झाल्याने आणि न्यायालयीन स्थगितीमुळे निर्माण झालेल्या कायदेशीर अडचणी लक्षात घेऊन ५ टक्के आरक्षण पूर्णतः रद्द करण्यात येत आहे. त्याचबरोबर संबंधित सर्व प्रशासकीय प्रक्रिया थांबविण्यात आल्या आहेत. त्या वेळी राज्याचे अल्पसंख्याक कल्याण मंत्री असलेल्या नसीम खान यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समाजासाठी ५ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव चर्चेविना एकमताने मंजूर करण्यात आला होता, अशी नोंद शासन निर्णयात आहे.

राज्य सरकारने नोकरी आणि शिक्षणातील मुस्लिमांसाठीचा ५ टक्के आरक्षणाचा निर्णय अधिकृतपणे रद्द केल्यानंतर विरोधी पक्षांनी महायुती सरकारवर तीव्र टीका केली आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील प्रशासन "अल्पसंख्याकविरोधी" असल्याचा आरोप काँग्रेस आणि शरद पवार गटाच्या नेत्यांनी केला आहे.

मंगळवारी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, विशेष मागासवर्गीय श्रेणी (अ) अंतर्गत सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटांना देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आले आहे. याआधीचा अध्यादेश कालबाह्य झाला असून त्यावर मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली होती.

मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी या निर्णयाला "लोकशाहीसाठी हानिकारक" असे संबोधले. सरकारने प्रक्रिया मजबूत करण्याऐवजी न्यायालयीन स्थगिती आणि अध्यादेश कालबाह्य झाल्याचा आधार घेत आरक्षणाशी संबंधित सर्व प्रक्रिया रद्द केल्याचा आरोप त्यांनी केला. "एकीकडे 'सबका साथ, सबका विकास'ची भाषा आणि दुसरीकडे आवश्यक कागदपत्रांचा मार्ग रोखण्याचे धोरण," असा टोला त्यांनी लगावला. गायकवाड यांनी असेही म्हटले की, न्यायालयाने शैक्षणिक आरक्षणाबाबत अंतरिम दिलासा दिला असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. तसेच सत्ताधारी मित्रपक्षांची भूमिका काय आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# न्यायालयाच्या निर्बंधांमुळे तारीख देता येत नाही...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** फरार घोषित करण्यात आलेला फरार उद्योगपती विजय मल्ल्या याने मुंबई उच्च न्यायालयात युक्तिवाद करत, इंग्लंडमधील न्यायालयीन आदेशांमुळे भारतात परतण्याची निश्चित तारीख देऊ शकत नसल्याचे सांगितले.

मल्ल्या याने वरिष्ठ वकील अमित देसाई यांच्यामार्फत न्यायालयात निवेदन सादर केले. त्यामध्ये २०१६ मध्ये केंद्र सरकारने त्याचा भारतीय पासपोर्ट रद्द केला असून, प्रवासासाठी आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच इंग्लंड आणि वेल्समधील न्यायालयांनी देश सोडण्यावर निर्बंध घातले असल्याचेही स्पष्ट केले.

मुख्य न्यायाधीश अलोक अराधे आणि न्यायमूर्ती गौतम अंकर यांच्या खंडपीठाने गेल्या आठवड्यात स्पष्ट केले होते की, मल्ल्याला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या आदेशाविरोधातील अपीलावर तोपर्यंत सुनावणी होणार नाही, जोपर्यंत ते भारतात प्रत्यक्ष हजर होत नाहीत. त्यानंतर मल्ल्या याने आपली भूमिका स्पष्ट करणारी याचिका दाखल केली. त्याने उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या आहेत. पहिल्या याचिकेत त्याला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे, तर दुसऱ्या याचिकेत फरार आर्थिक गुन्हेगार कायद्याच्या घटनात्मक वैधतेवर प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

## संपादकीय

# ढाक्यातील बदल आणि दिल्लीची कसोटी



**तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली ढाक्यात सत्तांतर झाले असले तरी भारत-बांगलादेश संबंधांसाठी ही केवळ औपचारिक घटना नाही; ती नव्या समीकरणांची सुरुवात आहे. इतिहासातील तणाव, सुरक्षेच्या चिंता आणि भूराजकीय स्पर्धा यांच्या छायेत दोन्ही देशांना संयमाने पुढे जावे लागेल..**

तारिक रहमान यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्याने भारत-बांगलादेश संबंध एका नव्या वळणावर आले आहेत. इतिहासाच्या स्मरणरंजनात अडकून न पडता वास्तवाच्या कसोटीवर नवे समीकरण उभे करण्याची ही वेळ आहे. संधी आणि संशय दोन्ही एकाच वेळी उपस्थित आहेत. २००१ ते २००६ या काळात बीएनपी-जमात आघाडीच्या सत्ताकाळाने दिल्ली-ढाका संबंधांना चांगलीच झळ पोहोचवली होती. खालिदा झिया यांच्या नेतृत्वाखालील त्या सरकारच्या काळात सीमापार दहशतवादी हालचाली, ईशान्य भारतातील बंडखोर गटांना मिळालेली आश्रयस्थाने आणि निवडणुकांनंतर हिंदू अल्पसंख्याकांवरील हिंसाचार या घटना भारताच्या स्मरणातून पुसलेल्या नाहीत. इतिहासाचा हा अध्याय केवळ नोंदीपुरता मर्यादित नाही; तो धोरणनिर्मितीवर सावली टाकणारा आहे. २००९ नंतर शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारशी भारताने जाणीवपूर्वक संबंध दृढ केले. सुरक्षा सहकार्य, सीमारेषा करार, जलवाटपावरील संवाद आणि आर्थिक देवघेव या सर्व क्षेत्रांत प्रगती झाली. ईशान्य भारतातील बंडखोरांविरुद्ध कारवाई करून ढाक्याने दिल्लीचा विश्वास संपादन केला. त्यामुळेच सध्याचा बदल हा केवळ सत्तांतर नाही; तो धोरणात्मक सातत्य टिकवण्याची कसोटी आहे. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारने प्रचारादरम्यान उघड भारतविरोधी भाषा टाळली, हा सकारात्मक संकेत मानावा लागेल. जाहीरनाम्यात धार्मिक स्वातंत्र्य आणि सांप्रदायिक सलोखा राखण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. परंतु निवडणूक भाष्य आणि सत्तेतील व्यवहार यात फरक असतो. विशेषत: जेव्हा जमात-ए-इस्लामीसारखा घटक राजकीय समीकरणात प्रभावी ठरतो, तेव्हा धोरणात्मक स्पष्टता अधिक आवश्यक ठरते. सीमेलगतच्या मतदारसंघांत त्यांची वाढती ताकद दिल्लीसाठी केवळ राजकीय आकडेवारी नाही; ती सुरक्षा गणिताचा भाग आहे. सर्वात गुंतागुंतीचा प्रश्न म्हणजे शेख हसीना यांचा. ढाक्याने प्रत्यार्पणाची औपचारिक मागणी केली आहे. परंतु नवी दिल्लीने ती मान्य करावी, अशी अपेक्षा अवास्तव ठरेल. आंतरराष्ट्रीय निरीक्षणांनुसार आयसीटीचा निकाल न्यायनिष्ठेपेक्षा सूडभावनेने प्रेरित असल्याची शंका व्यक्त झाली आहे. अशा परिस्थितीत एखाद्या माजी पंतप्रधानाला परत पाठवणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक आणि धोरणात्मक प्रश्न निर्माण करणारे ठरेल. दिल्लीने येथे संयम आणि विवेक यांचा समतोल राखणे अपरिहार्य आहे. दरम्यान, मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम काळात हिंदू अल्पसंख्याकांवरील हिंसाचार रोखण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचे आरोप झाले. अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ अंतर्गत विषय म्हणून झटकता येणार नाही. भारतासाठी तो भावनिक आणि राजकीय दोन्ही स्तरांवर संवेदनशील आहे. रहमान सरकारसमोर पहिली परीक्षा म्हणजे या समुदायांना विश्वास देणे. सांप्रदायिक सलोखा केवळ घोषणेत नव्हे, तर प्रशासनिक कृतीतून दिसला पाहिजे. भूराजकीय पटावर आणखी एक चल घटक आहे: चीन. युनूस यांच्या काळात बीजिंगने पायाभूत गुंतवणुकीत वाढ केली आणि इस्लामाबादनेही ढाकाशी संबंध पुनर्जीवित करण्याचे प्रयत्न केले. हिंद महासागर परिसरात प्रभाव वाढवण्याच्या शर्यतीत बांगलादेशाचे स्थान महत्त्वाचे आहे. चिटगाव आणि मोंगला बंदरांचे सामरिक महत्त्व, ऊर्जा प्रकल्प आणि पायाभूत सुविधा यांमध्ये बाह्य शक्तींची उपस्थिती वाढल्यास दिल्लीने डोळेझाक परवडणारी नाही. याचा अर्थ संशयकुशंकाच नव्हे; परंतु सतर्कता आणि पर्यायी सहकार्याची आक्रमक मांडणी आवश्यक आहे. तथापि, संबंधांची पायाभरणी केवळ सुरक्षा चिंतेवर उभी राहत नाही. सामायिक इतिहास, भाषा आणि सांस्कृतिक जवळीक हे या समीकरणाचे मृदू परिमाण आहेत. व्यापार आणि संपर्कवाढ यांत मोठी क्षमता दडलेली आहे. ईशान्य भारतासाठी बांगलादेशामार्गे समुद्रप्रवेश, ऊर्जा वहन आणि सीमावर्ती बाजारपेठांचे एकत्रीकरण ही दोन्ही देशांसाठी लाभदायी शक्यता आहेत. मोठ्या खेळाडूकडून अपेक्षित असलेली उदारता येथे दिल्लीने दाखवावी लागेल. रहमान सरकारनेही वास्तवाची जाणीव ठेवली पाहिजे. भारताशी तणाव निर्माण करून अल्पकालीन राजकीय लाभ मिळू शकतो; परंतु दीर्घकालीन आर्थिक आणि सामरिक तोटा अपरिहार्य ठरतो. बंडखोर गटांना पाठीशी घालण्याचा भूतकाळ पुन्हा उभा राहू नये, ही स्पष्ट हमी आणि कृती आवश्यक आहे. सुरक्षा सहकार्याची यंत्रणा मजबूत ठेवणे दोघांच्याही हिताचे आहे. भारतीय राजकीय व्यवस्थेलाही भाषण आणि धोरण यात संयम राखावा लागेल. शेजारी राष्ट्रांशी संबंध हे अंतर्गत राजकारणाचे साधन बनले, तर त्याचे दुष्परिणाम सीमापार पोहोचतात. दीर्घकालीन दृष्टी, संस्थात्मक संवाद आणि सततचा संपर्क या त्रिसूत्रीवर संबंध उभे राहतात. जयशंकर यांचा ढाका दौरा आणि शपथविधीस भारतीय प्रतिनिधींची उपस्थिती हे संकेत सकारात्मक आहेत; परंतु ते प्रारंभबिंदू आहेत, गंतव्य नव्हे. ढाक्यातील सत्तांतर हा अपरिहार्य लोकशाही प्रवासाचा भाग आहे. दिल्लीसमोर प्रश्न असा की या बदलाला ती कशी प्रतिसाद देते.

# आरक्षणाचे राजकारण आणि न्यायालयीन कसोटी!

**» महाराष्ट्रात मुस्लिम समाजाला देण्यात आलेले पाच टक्के एसईबीसी आरक्षण रद्द करण्याचा निर्णय हा केवळ प्रशासकीय बदल नाही; तो आरक्षण धोरणातील सातत्य, न्यायालयीन मर्यादा आणि राजकीय निर्णयप्रक्रियेतील घाईगडबडीचा परिपाक आहे.**



महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेला हा निर्णय अनपेक्षित नाही; पण तो अस्वस्थ करणारा नक्कीच आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीच्या पार्श्वभूमीवर आणि अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर न झाल्यामुळे मुस्लिम समाजाला देण्यात आलेले पाच टक्के आरक्षण रद्द झाले. हे प्रकरण एका समाजाच्या सवलतीपुरते मर्यादित नाही; तर ते राज्याच्या आरक्षण धोरणातील विसंगतींचे प्रतीक आहे. २०१४ मध्ये मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिम समाजाला पाच टक्के आरक्षण जाहीर करताना राज्यातील एकूण आरक्षण ७३ टक्क्यांवर पोहोचले होते. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या ५० टक्के मर्यादेच्या पलीकडे जाण्याचा हा स्पष्ट प्रयत्न होता. त्या वेळी सामाजिक समतोलाच्या नावाखाली घेतलेले निर्णय राजकीय समीकरणांशी अधिक निगडित होते, हे उघड गुपितच. मंत्रिमंडळात कोणतीही व्यापक चर्चा न होता प्रस्ताव मंजूर झाला, ही बाबही तितकीच महत्त्वाची. आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर सखोल अभ्यास, आकडेवारी आणि कायदेशीर भक्कम पाया अपेक्षित असतो. तो कितपत होता, हा प्रश्न आज पुन्हा उभा राहतो. एसईबीसी या प्रवर्गाचा वापर करून मुस्लिम समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना लाभ देण्याचा प्रयत्न झाला. परंतु अध्यादेशाचे वेळेत कायद्यात रूपांतर न होणे ही केवळ तांत्रिक त्रुटी मानता येणार नाही. ती शासनाच्या धोरणात्मक अस्पष्टतेची साक्ष आहे. अध्यादेश काढणे हा तात्पुरता उपाय; त्याला विधिमंडळाची मान्यता मिळवणे ही खरी कसोटी. ती पार पडली नाही, आणि परिणामी सवलत आपोआप व्यपगत झाली. उच्च न्यायालयाने २०१४ मध्येच लोकसेवांमधील नियुक्त्यांसंदर्भात अंतरिम स्थगिती दिली होती. म्हणजेच या निर्णयावर कायदेशीर प्रश्नचिन्ह सुरुवातीपासूनच होते. अशा परिस्थितीत संबंधित लाभार्थ्यांमध्ये अपेक्षा निर्माण करणे आणि नंतर त्या अपेक्षांचे भंग करणे ही राज्यकर्त्यांची जबाबदारी टाळण्याची पद्धत ठरते. आरक्षण हे भावनांचे राजकारण नसून घटनात्मक चौकटीत बसणारे साधन आहे, याची जाणीव सत्ताधाऱ्यांना असणे अपेक्षित. मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक मागासलेपणाबाबत विविध आयोगांनी नोंदी केल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर उपाययोजना आवश्यक आहेत, यात दुमत नाही. परंतु उपाय म्हणून आरक्षणच हा एकमेव मार्ग आहे का, याचाही विचार व्हायला हवा. शिक्षणातील पायाभूत सुविधा, शिष्यवृत्ती योजना, कौशल्यविकास कार्यक्रम आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या धोरणांद्वारेही समान संधी निर्माण करता येतात. केवळ टक्केवारी जाहीर करून सामाजिक न्याय साध्य होत नाही. मराठा आरक्षणाच्या संदर्भातही राज्याने घेतलेले निर्णय आणि त्यानंतरची न्यायालयीन घडामोडी यांचा अनुभव ताजा आहे. वारंवार न्यायालयीन धक्के बसूनही आरक्षणाच्या राजकारणातून धडा घेतला गेला का, हा प्रश्न आहे. प्रत्येक वेळी समाजघटकांच्या अपेक्षा पेटवायच्या आणि न्यायालयीन मर्यादांचा धक्का बसल्यावर हात झटकायचे, ही पद्धत लोकशाहीस अपायकारक आहे. आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर नाही; तर तो सामाजिक कराराचा भाग आहे. एका समाजाला दिलेली सवलत दुसऱ्याच्या संधींवर परिणाम करते, अशी भावना निर्माण झाली की तणाव वाढतो. त्यामुळे कोणताही निर्णय डेटा, सर्वसमावेशक चर्चा आणि घटनात्मक कसोटी या तिन्हींच्या आधारे घ्यावा लागतो. अन्यथा तो राजकीय घोषणा ठरतो. या प्रकरणात आणखी एक मुद्दा प्रकर्षाने पुढे येतो: शासनातील सातत्याचा अभाव. बारा वर्षांपूर्वी जाहीर केलेला निर्णय आज रद्द होतो, याचा अर्थ धोरणात्मक स्थैर्य नाही. समाजघटकांना दीर्घकालीन नियोजनासाठी स्पष्ट संकेत मिळत नाहीत. शिक्षण आणि नोकरीच्या संधींबाबतची अनिश्चितता तरुण पिढीसाठी घातक ठरते. महाराष्ट्रासमोर खरे आव्हान हे आहे की सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाची अचूक व्याख्या करणे आणि त्यावर बहुआयामी उपाययोजना आखणे. आरक्षण हे त्या उपाययोजनांपैकी एक असू शकते; परंतु तेच सर्वस्व नाही. घटनात्मक चौकट, न्यायालयीन मर्यादा आणि सामाजिक समतोल या तिन्हींचा ताळमेळ साधत धोरण राबवले, तरच त्याला दीर्घकालीन वैधता लाभेल. मुस्लिम आरक्षण रद्द करण्याचा निर्णय हा एका अध्यायाचा शेवट असला तरी व्यापक चर्चेची सुरुवात ठरायला हवा. सामाजिक न्यायाचा प्रश्न भावनिक घोषणांवर नव्हे, तर ठोस आकडेवारी आणि सुजाण धोरणांवर उभा राहतो. अन्यथा आरक्षण हा शब्द निवडणुकीपुरता घोषवाक्य ठरतो आणि समाजघटक पुन्हा एकदा अपेक्षाभंगाचे बळी ठरतात.

# शिवजयंतीनिमित्त पुण्यात वाहतूक बदल; १९ फेब्रुवारीला मध्यवर्ती भागात मार्गांतर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता आदी प्रमुख मार्गांवर तात्पुरती वाहतूक व्यवस्था



पुणे : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गुरुवारी (१९ फेब्रुवारी) शहराच्या मध्यवर्ती भागातून भव्य मिरवणुका काढण्यात येणार आहेत. मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती अपेक्षित असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुणे शहर वाहतूक पोलीस यांनी विशेष नियोजन केले आहे. सकाळी सात वाजल्यापासून सायंकाळी गर्दी संपेपर्यंत आवश्यकतेनुसार प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक वळविण्यात येणार आहे.

लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता तसेच आसपासच्या मार्गांवर वाहतूक बदल लागू राहतील. जिजामाता चौकातून शिवाजी रस्त्याने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांनी स. गो. बर्वे चौक – जंगली महाराज रस्ता – खंडुजीबाबा चौक – टिळक चौक – टिळक रस्तामार्गे पर्यायी मार्गाचा वापर करावा. गणेश रस्त्याने फडके हौद चौक व जिजामाता चौकाकडे येणारी वाहतूक दारूवाला पूल चौकातून वळवली जाईल.

केळकर रस्त्यावरून अप्पा बळवंत चौक – जोगेश्वरी मंदिर – बुधवार चौकाकडे जाणारी वाहतूक गरजेनुसार बदलली जाईल. लक्ष्मी रस्त्यावर मिरवणूक सुरू असताना सोन्या मारुती चौकातून पुढे जाणाऱ्या वाहनांना संत कबीर चौक (समर्थ विभाग) मार्गे वळवले जाईल. पुरम चौकातून बाजीराव रस्त्याने शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनांनी टिळक रस्ता – अलका टॉकीज चौक – एफ.सी. रस्ता हा पर्यायी मार्ग स्वीकारावा. मिरवणूक गाडगीळ पुतळा परिसरातून पुढे सरकेपर्यंत शनिवारवाड्याकडे जाणारी वाहतूक कॉसमॉस बँक जंक्शन – बालगंधर्व – टिळक पूलमार्गे वळविण्यात येईल. तसेच स. गो. बर्वे चौकातून महापालिका भवनाकडे जाणाऱ्यांनी जंगली महाराज रस्ता – झाशी राणी चौक मार्गाचा वापर करावा.

मिरवणुकीदरम्यान अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात राहणार असून नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, पर्यायी मार्गांचा वापर करावा व अनावश्यक वाहन वापर टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यात देहविक्रय करणाऱ्या महिलेची निर्घृण हत्या; सहा जणांचा सहभाग उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत देहविक्रय करणाऱ्या एका महिलेची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सहा जणांनी महिलेला जबरदस्तीने रिक्षामध्ये बसवून निर्जन ठिकाणी नेले आणि वादातून तिला दगडाच्या खाणीत ढकलून दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून इतरांचा शोध सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, आरोपी महिलेला खडी मशीन चौक परिसरात घेऊन गेले. तेथे तिच्यासोबत संबंध ठेवल्यानंतर काही कारणावरून वाद झाला. संतापाच्या भरात आरोपींनी काठीने मारहाण केली आणि गंभीर जखमी अवस्थेत तिला कोंढवा येथील जुन्या दगड खाणीत ढकलल्याचे तपासात समोर आले आहे. गेल्या आठवड्यात या खाणीत तिचा मृतदेह आढळला होता. शवविच्छेदन अहवालात शरीरावर मारहाणीच्या खुणा व अनेक फ्रॅक्चर आढळल्याने हा अपघात नसून खून असल्याचे स्पष्ट झाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिला व मुख्य आरोपी एकमेकांना ओळखत होते. तपासादरम्यान आरोपींनी सीसीटीव्हीमधून ओळख टाळण्यासाठी रिक्षामध्ये बदल केल्याचेही उघड झाले आहे. पुणे गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध व पुढील तपास वेगाने सुरू आहे.

# 'पर्वती' मतदारसंघासाठी ३२ कोटी ८३ लाखांचा निधी प्रस्तावावर वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका द्वारे 'पर्वती' विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी ₹32 कोटी ८३ लाख निधी पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात राखून देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीतून पुढे ढकलून सर्वसाधारण सभेला पाठवण्यात आला होता, परंतु यावर महत्त्वाचा वाद उभा राहिला आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सुरुवातीला असा कोणताही प्रस्ताव मंजूर केला नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, स्थायी समितीच्या बैठकेंत आयोगाच्या अध्यक्षतेखाली हा प्रस्ताव कोणत्याही चर्चेशिवाय मान्य करण्यात आल्याचेही नोंद आले आहे. पुढे हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता, ज्यामुळे पालिकेत चर्चा आणि प्रश्नांची उभारणी झाली आहे.

या निधी प्रस्तावाचा आधार म्हणजे महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ७२ (b), ज्याद्वारे विशिष्ट मतदारसंघातील विकासकामांसाठी निधी राखीव ठेवता येतो. तथापि, हे नियम विविध विकासकामांबाबत वापरण्यात आल्याने पालिकेतच मतभेद निर्माण झाले आहेत. काही नगरसेवकांच्या मते, प्रशासनाने नियमाचा हेतू लक्षात घेत योग्य चर्चा व निर्णय प्रक्रियेचा अवलंब केला पाहिजे. प्रस्तावातील निधीचा वापर पारदर्शकपणे आणि नियोजनानुसार करावा, असा आग्रह विरोधकांनी व्यक्त केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त औंध रोड परिसरात महापालिकेची संयुक्त मोहीम

## स्वच्छता, अतिक्रमण व मूलभूत सुविधांची पाहणी; दोन महिन्यांतून एकदा शहरभर ड्राईव्हचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महानगरपालिकाच्या औंध रोड कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विशेष संयुक्त स्वच्छता व पाहणी मोहीम राबविण्यात आली. या ड्राईव्हमध्ये सर्व विभागांचे प्रमुख, वार्ड अधिकारी नायकर यांच्यासह आरोग्य, अतिक्रमण, विद्युत, उद्यान आणि ड्रेनेज विभागाचे अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते राजर्षी शाहू महाराज चौक या मार्गावर ही सखोल पाहणी करण्यात आली. परिसरातील स्वच्छता, अनधिकृत अतिक्रमण, विद्युत व्यवस्था, हिरवळ तसेच ड्रेनेज यंत्रणेची स्थिती तपासून आवश्यक सुधारणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

या मोहिमेत उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हन, नगरसेविका सपना छाजेड, भक्ती गायकवाड तसेच आनंद छाजेड, अमित मुरकुटे, अविनाश कदम व स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपमहापौर वाडेकर यांनी अशाच प्रकारची संयुक्त मोहीम दोन महिन्यांतून एकदा शहरातील सर्व प्रभागांमध्ये, विशेषतः झोपडपट्ट्या व प्रमुख रस्त्यांवर राबविण्याचे निर्देश दिले.

सातत्यपूर्ण कारवाईमुळे नागरिकांच्या दैनंदिन समस्या तातडीने मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत १४ नामवंत शाहिरांचा ओजस्वी कार्यक्रम

# भक्ती-शक्ती उद्यानात शाहिरीतून शिवरायांना मानवंदना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प उद्यान येथे डफाच्या तालावर घुमणाऱ्या ओजस्वी स्वरांनी परिसर दुमदुमला आणि "शाहिर हा महाराष्ट्राचा प्राण..." या घोषणेतून छत्रपतींना अभिवादन करण्यात आले. पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराजांना शाहिरीतून मानवंदना' या विशेष कार्यक्रमात १४ नामवंत शाहिरांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना काव्यमय सलाम अर्पण केला.



'छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६' या उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात शिवजन्मोत्सवापासून राज्याभिषेकापर्यंतचा गौरवशाली इतिहास शब्दबद्ध झाला. ताल, लय आणि दमदार वाणीच्या संगमातून शौर्य, धैर्य, न्यायनिष्ठा आणि स्वाभिमानाची परंपरा जिवंत झाली. उपस्थित नागरिकांनी अक्षरशः शिवकालीन वातावरणाचा अनुभव घेतला.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात शाहीर प्रकाश ढवळे, शाहीर अशोक कामथे, शाहीर बाळासाहेब मालुसकर, शाहीर चैतन्य काजुळकर, शाहीर जालिंदर शिंदे, शाहीर लीना देशपांडे, शाहीर वनिता मोहिते, शाहीर कांचन जोशी, शाहीर प्रचिती विष्णूरकर, शाहीर स्मिता बांदिवडेकर, शाहीर चित्रा कुलकर्णी, शाहीर उज्ज्वला जाधव, शाहीर राजरत्न पांडगळे आणि शाहीर घनश्याम कुदळे यांनी सहभाग घेतला. त्यांच्या ओजस्वी शाहिरीतून स्वराज्याची पताका आणि राष्ट्रभक्तीची जाज्वल्य ज्योत प्रज्वलित झाली.

**सहभागी शाहिर :**

- प्रकाश ढवळे, अशोक कामथे, बाळासाहेब मालुसकर, चैतन्य काजुळकर, जालिंदर शिंदे, लीना देशपांडे, वनिता मोहिते, कांचन जोशी, प्रचिती विष्णूरकर, स्मिता बांदिवडेकर, चित्रा कुलकर्णी, उज्ज्वला जाधव, राजरत्न पांडगळे, घनश्याम कुदळे
- कार्यक्रमातील वैशिष्ट्ये :
- डफाच्या तालावर ओजस्वी शाहिरी सादरीकरण
- शिवजन्मोत्सव ते राज्याभिषेक इतिहासाचा प्रभावी आढावा
- स्वराज्य, स्वाभिमान आणि राष्ट्रभक्तीचा संदेश
- नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे व वासुदेव बळवंत फडके यांना महापालिकेकडून अभिवादन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** "जगेन तर देशासाठी आणि मरेन तर देशासाठी" अशी क्रांतिकारी घोषणा देणारे लहुजी वस्ताद साळवे आणि त्यांना साथ देणारे वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिका यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. चिंचवड स्टेशन येथील पुतळ्यास तसेच महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीतील प्रतिमेस महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण केला.

यावेळी बोलताना महापौर लांडगे म्हणाले की, लहुजी वस्ताद साळवे हे युद्धनितीमध्ये पारंगत आणि देशभक्तीने प्रेरित नेते होते. त्यांनी हजारो तरुणांना संघटित करून इंग्रजांविरुद्ध लढ्याची ठिणगी पेटवली. तर वासुदेव बळवंत फडके यांनी परकीय सत्तेविरोधात ठाम भूमिका घेत स्वातंत्र्यलढ्याला नवे बळ दिले. या दोन्ही क्रांतिवीरांचे कार्य भारतीय स्वातंत्र्य इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे असून त्यांचा देशनिष्ठेचा आदर्श आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्या अनुराधा गोरखे, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, उपायुक्त अण्णा बोदडे तसेच नागरिक उपस्थित होते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लोटस पॉईंट येथे तरुणाचा बुडून मृत्यू

**मुळशी :** तालुक्यातील एकोले गावाजवळील लोटस पॉईंट येथे पाण्यात बुडून २१ वर्षीय आयुष हरिणखेडे याचा मृत्यू झाला. तो मूळचा गोंदिया जिल्ह्यातील असून सध्या कात्रज, पुणे येथे राहत होता. मित्रांसोबत फिरायला आलेल्या आयुषला पोहता येत नसताना तो पाण्यात उतरला आणि खोल पाण्यात गेला. माहिती मिळताच पौड पोलीस ठाणे व बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. सुमारे दीड तासांच्या प्रयत्नांनंतर मृतदेह बाहेर काढण्यात आला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### दुचाकी चोरीतून घरफोड्यांचा पर्दाफाश

**पुणे :** फुरसुंगी पोलीस ठाणे यांनी दुचाकी चोरीचा तपास करताना दोन अल्पवयीन मुलांकडून घरफोड्यांची मालिका उघडकीस आणली. अमोल कुंभार यांची 'होंडा शाईन' चोरीला गेल्याची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून फुरसुंगी रेल्वे पुलाजवळ संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी चोरलेल्या दुचाकींचा वापर करून दोन ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी २ दुचाकी, मोबाईल, रोकड व महागडे कपडे असा सुमारे १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास सुरू आहे.

### हॉटेलच्या किचनमध्ये सिलेंडर स्फोट

**लोणी काळभोर :** पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गलगत कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत कृष्णा लॉजजवळील एका हॉटेलच्या किचनमध्ये मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. गॅस गळतीमुळे हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

## खवले मांजराचे खवले व सांबराची शिंगे जप्त; दोघांना अटक, न्यायालयाकडून जामीन

# मंचरमध्ये वनविभागाची धडक कारवाई!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** मंचर परिसरात वन्यजीवांची शिकार करून त्यांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्या दोघांना वनविभागाने अटक केली असून त्यांच्या ताब्यातून खवले मांजराचे सुमारे तीन किलो खवले, नखे आणि सांबराची शिंगे जप्त करण्यात आली आहेत. ही माहिती मंचरचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

वनपरिक्षेत्र अधिकारी भोसले यांना मंचर परिसरात खवले मांजर व सांबर यांच्या अवयवांची बेकायदेशीर तस्करी होणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार वनविभागाच्या पथकाने सापळा रचला. मंचर येथील मोरडे फुड्स कंपनीजवळ झटका खानावळीच्या मागे उभ्या असलेल्या मारुती सुझुकी कंपनीच्या स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच ०४ डीवाय ५६७) या निळ्या रंगाच्या चारचाकी वाहनावर अचानक धाड टाकण्यात आली.

या कारवाईत उदय शंकर सुर्वे (रा. शिस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) आणि नईम करीम खान (रा. वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या जवळून खवले मांजराचे अंदाजे तीन किलो खवले, तीन नखे तसेच सांबराची चार शिंगे जप्त करण्यात आली. याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

प्राथमिक चौकशीत आरोपी हे वन्यप्राणी खवले मांजर आणि सांबर यांची शिकार करून त्यांच्या अवयवांची विक्री करत असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा शोध सुरू असून तपासाची सूत्रे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या हाती आहेत.

दोन्ही आरोपींना १६ तारखेला अटक करून १७ तारखेला घोडेगाव येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे.

वनविभागाने स्पष्ट केले आहे की खवले मांजर आणि सांबर हे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असून त्यांच्या शिकारीस, विक्रीस, वाहतुकीस किंवा व्यापारास सक्त मनाई आहे. अशा गुन्ह्यांसाठी सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची तसेच २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. नागरिकांनी अशा वनगुन्ह्यांमध्ये सहभागी होऊ नये, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

ही कारवाई पुणे वनसंरक्षक आशिष ठाकरे व जुन्नरचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. उपवनसंरक्षक लोकेश पाटील, सहाय्यक उपवनसंरक्षक अमृत शिंदे, वनरक्षक रईस मोमीन, त्र्यंबक जगताप, शिवाजी ढोले, पूजा पवार, छकुली शिवशरण आदींनी या मोहिमेत सहभाग घेतला. वनविभागाच्या या धडक कारवाईमुळे वन्यजीव तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त जुन्नर तालुक्यात विज्ञान व्याख्यानमाला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ १० शाळांतील ५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना युवा शास्त्रज्ञ डॉ. प्रतिक मुणगेकर यांचे मार्गदर्शन

**जुन्नर :** राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून माशेलकर- स्वरूप स्पेस अँड इनोवेशन सेंटर, नारायणगाव यांच्या वतीने जुन्नर तालुक्यातील दहा शाळांमध्ये तीन दिवसीय विज्ञान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या या उपक्रमातून ५ हजारांहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमींना मार्गदर्शन मिळणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ. रतिलाल बाबेल यांनी दिली.

दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी देशभरात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. नोबेल पारितोषिक विजेते प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांनी १९२८ साली लावलेल्या 'रमण प्रभाव' या शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे आणि संशोधनाची आवड निर्माण करणे, हा या व्याख्यानमालेचा मुख्य उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे युवा शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्रतिक मुणगेकर (FRSA) हे या व्याख्यानमालेत मार्गदर्शन करणार आहेत. विज्ञान आणि आजचा समाज, वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश संशोधन, शास्त्रज्ञ होण्यासाठी आवश्यक गुण, वैज्ञानिक विचारसरणी आणि देशाच्या प्रगतीसाठी संशोधनाचे महत्त्व अशा विविध विषयांवर ते संवाद साधणार आहेत. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी स्वतंत्र वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. श्री. चैतन्य विद्यालय ओतूर, श्री. गाडगे महाराज विद्यालय, श्री. गाडगे महाराज आश्रमशाळा, सावित्रीबाई फुले कन्या शाळा (ओतूर), जयहिंद पॉलिटेक्निक, जयहिंद इंटरनॅशनल स्कूल, श्री. ज्ञानेश्वर विद्यालय सावरगाव, शिवनेरी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज खानापूर तसेच शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा सोमतवाडी या शाळांमध्ये ही व्याख्यानमाला होणार आहे.

# भिगवणमध्ये अपहरण प्रकरणावरून तणाव

## जनआक्रोश मोर्चाला परवानगी नाकारली; पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भिगवण :** भिगवणजवळील २१ वर्षीय तरुणीच्या अपहरण प्रकरणानंतर शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे. संतप्त नागरिकांनी मंगळवारी रात्री उशिरा पुणे–सोलापूर महामार्ग रोखून धरत निषेध नोंदविला. दरम्यान, आज बुधवारी दुपारपर्यंत अपहृत तरुणी व आरोपींचा शोध लागलेला नसून पोलिसांकडून तपास वेगाने सुरू आहे.

मंगळवारी रात्री सुमारे ११ वाजता संतप्त नागरिक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी अचानक रस्त्यावर ठाण मांडत घोषणाबाजी केली. परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांना मोठा बंदोबस्त ठेवावा लागला. पोलिसांनी संयमाने हस्तक्षेप करत जमावाला शांत केले. घटनेच्या निषेधार्थ भिगवणमध्ये बुधवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. दरम्यान, आमदार गोपीचंद पडळकर व संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत 'हिंदू जनआक्रोश' निषेध मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारल्याची माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी पत्रकार परिषदेत दिली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अपहरण प्रकरणात झहीर शेख व आयन शेख या दोघांवर संशय व्यक्त करण्यात आला आहे. पीडित व आरोपी एकमेकांच्या घराशेजारी राहत होते व त्यांच्यात संपर्क होता, अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपींच्या शोधासाठी सहा पथके रवाना करण्यात आली असून तांत्रिक व गोपनीय तपास सुरू असल्याचे गिल्ल यांनी सांगितले. सर्व समाजातील प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली असून अफवा पसरवू नयेत, तणाव वाढवू नये, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

घटनेनंतर पोलिस ठाण्याबाहेर मोठी गर्दी झाली होती. भाजपचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर, मारुतराव वणवे आदींनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन तपासाची माहिती घेतली. तसेच येथील पिराचा दर्गाह मस्जिद इंडोमेंट ट्रस्टच्या वतीनेही पोलिसांना निवेदन देण्यात आले. या घटनेचा निषेध करत आरोपींना तात्काळ अटक करून दोषारोपपत्र दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, अपहृत तरुणीचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी विविध स्तरांतून होत आहे.

# वडगावपीर सोसायटीच्या अध्यक्षपदी दिलीप पोखरकर बिनविरोध

## ६५९ सभासदांची अग्रगण्य संस्था; ५.४५ कोटींचे कर्जवाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वडगावपीर (ता. आंबेगाव):** वडगावपीर (ता. आंबेगाव) येथील वडगावपीर–मांदळेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी दिलीप पोखरकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. माजी अध्यक्ष तुकाराम रामचंद्र आदक यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी मंचर येथे संचालक मंडळाची विशेष बैठक पार पडली.

निवडणूक निर्णय अधिकारी विवेक वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अध्यक्षपदासाठी केवळ एकच अर्ज प्राप्त झाल्याने दिलीप पोखरकर यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवड प्रक्रियेस संस्थेचे सचिव निवृत्ती सिनलकर यांनी सहकार्य केले.

निवडीनंतर पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभागीय अधिकारी विष्णू गायकवाड यांच्या हस्ते नूतन अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे उपाध्यक्ष बाळू आदक तसेच सर्व संचालक उपस्थित होते.

६५९ सभासदांच्या माध्यमातून कार्यरत असलेली ही सोसायटी शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी कर्जपुरवठा करणारी तालुक्यातील एक अग्रगण्य संस्था मानली जाते. संस्थेचे भागभांडवल सुमारे १६ लाख रुपये असून चालू आर्थिक वर्षात ५ कोटी ४५ लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात आल्याची माहिती सचिव सिनलकर यांनी दिली. सभासदांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन नूतन अध्यक्ष दिलीप पोखरकर यांनी व्यक्त केले.

# जुन्नर नगरपरिषदेच्या १३८ कोटींच्या अर्थसंकल्पावर नागरिकांनी सूचना द्याव्यात

## नगराध्यक्षा सुजाता काजळे यांचे आवाहन; २८ फेब्रुवारीपर्यंत सूचना स्वीकारणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नर नगरपरिषद चा सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा तब्बल १३८ कोटी १५ लाख ३ हजार रुपयांचा अर्थसंकल्प विशेष सभेत सादर करण्यात आला असून, या अर्थसंकल्पावर नागरिकांनी आपल्या सूचना व माहिती लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी केले आहे.

दि. ११ फेब्रुवारी रोजी झालेल्या विशेष सभेत यावर्षीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. मात्र नवनिर्वाचित नगरसेवकांना अर्थसंकल्पाचा सविस्तर अभ्यास करता यावा, यासाठी सदर सभा तहकूब करण्यात आली. आता ही सभा दि. २८ फेब्रुवारीपर्यंत पुन्हा बोलावण्यात येणार असून, त्यावेळी नागरिकांकडून लेखी स्वरूपात प्राप्त झालेल्या योग्य व रास्त सूचनांचा विचार केला जाणार आहे.

नगराध्यक्षा काजळे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या या अर्थसंकल्पात विविध पायाभूत सुविधा, नागरी सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, सार्वजनिक आरोग्य आदी क्षेत्रांसाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शहरातील सजग नागरिकांनी अर्थसंकल्पाचा अभ्यास करून आपल्या सूचना नगरपरिषद कार्यालयात पुढील आठ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर कराव्यात.

नागरिकांच्या सोयीसाठी अर्थसंकल्पाची प्रत नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्थसंकल्पात अंदाजे १३७ कोटी ७७ लाख रुपयांची खर्च बाजू दर्शविण्यात आली असून, ३८ लाख ३ हजार रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक प्रस्तावित करण्यात आले आहे.

शहराच्या विकास प्रक्रियेत नागरिकांचा थेट सहभाग वाढावा आणि लोकशाही पद्धतीने निर्णय प्रक्रिया पार पडावी, या उद्देशाने नागरिकांच्या सूचनांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेत आपल्या कल्पना व सूचना सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पाण्याच्या टंचाईमुळे आंबीत चितळांचा वावर

**वेल्हे :** उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना जंगलातील नैसर्गिक पाणवठे, ओढे आणि झरे कोरडे पडू लागले आहेत. परिणामी वन्यजीव पाण्याच्या आणि अन्नाच्या शोधात नागरी वस्तीकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. आंबी (ता. हवेली) येथे गेल्या दोन दिवसांपासून चितळ जातीची दोन हरणे मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. सायंकाळनंतर ही हरणे गावाशेजारील शेतात मुक्काम करतात आणि पहाटे उजाडण्यापूर्वी पुन्हा जंगलाकडे परत जातात. शेतकऱ्यांनी सांगितले की, या हरणांमुळे कोणताही उपद्रव झालेला नाही. मात्र वन्यप्राणी वस्तीकडे वळल्याने ग्रामस्थांमध्ये कुतूहलासोबतच काहीशी चिंता व्यक्त होत आहे. हरणे निरुपद्रवी असली तरी त्यांच्या मागोमाग भक्षक प्राणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच रस्ते ओलांडताना अपघातांचा धोका वाढू शकतो.

# वैद्यवाडी फाट्याजवळ कारची विद्युत खांबाला धडक; एक जखमी

## एअरबॅग उघडल्याने अनर्थ टळला; धोकादायक खांब तातडीने हलवण्याची ग्रामस्थांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** लोणी-धामणी (ता. आंबेगाव), दि. १८ फेब्रुवारी २०२६ : पोंदेवाडी फाटा ते मंचर मार्गावर वैद्यवाडी फाट्याजवळ बुधवारी सकाळी सातच्या सुमारास झालेल्या अपघातात सेंट्रो कार विद्युत खांबाला धडकून एक जण जखमी झाला. सुदैवाने एअरबॅग उघडल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथून एमएच-१२/व्हीवो-६७५९ क्रमांकाची सेंट्रो कार अवसरी खुर्द येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे निघाली होती. कारमध्ये वाल्मीक गवळी, अविष्कार मावळ आणि अन्य एक जण प्रवास करत होते. तापकीर वस्ती परिसरात रस्त्यालगत उभ्या असलेल्या ३३ केव्ही विद्युत खांबाचा अंदाज चालकाला न आल्याने कार थेट खांबाला जाऊन धडकली. या धडकेत ३३ केव्हीची विद्युत तार तुटली; मात्र ती वरच अडकून राहिल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. कारमधील एक जण जखमी झाला असून त्याला तत्काळ पारगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले.

दरम्यान, या ठिकाणी रस्त्यालगत असलेल्या विद्युत खांबामुळे यापूर्वीही किरकोळ अपघात घडले असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. वाहतुकीस अडथळा ठरणारा हा धोकादायक खांब महावितरण कंपनीने तातडीने हलवावा, अन्यथा मोठी दुर्घटना होण्याची भीती आहे, अशी मागणी सत्यवान वैद्य, बाळासाहेब वैद्य, तुषार वैद्य, सागर तापकीर, विकास कापडी, गणेश कापडी यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

## महसूल विभागाच्या लेखी आश्वासनानंतर उपसरपंच अमोल दाभाडे यांचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित

# चांडोली खुर्दमध्ये सौर प्रकल्पावरून संघर्ष!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर (ता. आंबेगाव) :** आंबेगाव तालुक्यातील चांडोली खुर्द येथे गायरान जमिनीवर प्रस्तावित 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी' प्रकल्पावरून निर्माण झालेला वाद अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर तात्पुरता निवळला आहे. ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्यांसाठी उपसरपंच अमोल दाभाडे यांनी सुरू केलेले आमरण उपोषण तहसीलदारांच्या ठोस लेखी हमीनंतर स्थगित करण्यात आले.

सदर प्रकल्पासाठी सुमारे १२.८ हेक्टर गायरान जमीन संपादित करण्यात आली आहे. मात्र ग्रामसभेने केवळ २.०० हेक्टर जमीन देण्याचा ठराव मंजूर केलेला असताना उर्वरित संपूर्ण जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. भविष्यातील गावठाण विस्तार, भूमिहीन कुटुंबांना घरकुल, स्मशानभूमी, शैक्षणिक व आरोग्य सुविधा तसेच इतर मूलभूत गरजांसाठी ही जमीन अत्यावश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. प्रकल्पाचे काम करणाऱ्या आवादा कंपनीने ग्रामस्थांना विश्वासात न घेता काम सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे. गायरान जागेत पन्नास वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या पारधी समाजाच्या झोपड्या हटविण्यात आल्याने वातावरण अधिक तणावपूर्ण झाले. कंपनीच्या काही प्रतिनिधींनी ग्रामस्थांना धमक्या दिल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर उपसरपंच अमोल दाभाडे यांनी आमरण उपोषण सुरू केले. आंदोलनाची दखल घेत तालुक्यातील विविध पक्षांचे नेते दिवसभर आंदोलनस्थळी उपस्थित राहिले. उपविभागीय अधिकारी गोविंद जाधव यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधल्यानंतर तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी चांडोली खुर्द येथे भेट देत ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा केली. गावाच्या भविष्यातील गरजा, ठेकेदाराचा कथित मनमानी कारभार आणि प्रशासनाची भूमिका या सर्व मुद्द्यांवर चर्चा झाली. प्रशासनाकडून ग्रामस्थांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार केला जाईल, तसेच संबंधित ठेकेदार व ऊर्जा विभागाला

# महाशिवरात्री निमित्त ब्रह्माकुमारी केंद्रात रक्तदान व आरोग्य शिबिर

## शेकडो नागरिकांनी घेतला आरोग्य तपासणीचा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त ब्रह्माकुमारी यांच्या वतीने बाणेर येथील रायकर फार्म हाऊस परिसरातील ब्रह्माकुमारीज सेंटरमध्ये रक्तदान व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी दिग्दर्शक व नृत्यांगना वैशाली जाधव, संजय कृष्णा रायकर, घनश्याम रायकर, बाणेर शाखेच्या संचालिका डॉ. त्रिवेणी दिदी तसेच सकाळनगरच्या संचालिका बी.के. गीता दिदी यांच्यासह ब्रह्माकुमारी संस्थेचे सदस्य, वैद्यकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आदींची विनामूल्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमाचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. विशेष म्हणजे ४८ नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. यावेळी नाडी चिकित्सक डॉ. मंगेश यांनी आरोग्य जागरूकतेविषयी मार्गदर्शन करत निरोगी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. आध्यात्मिक वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे महाशिवरात्रीला सामाजिक सेवेची जोड मिळाली. आयोजकांनी भविष्यातही आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## सारांश वृत्त

### बारच्या वेळा बदलण्यास विरोध

**पठाणमथिट्टा (केरळ) :** राज्यातील बारच्या वेळा बदलण्याच्या एलडीएफ सरकारच्या निर्णयाला मालंकारा ऑर्थोडॉक्स चर्चने विरोध केला आहे आणि असा दावा केला आहे की यामुळे संपूर्ण पिढी, विशेषतः केरळमधील तरुणांचा नाश होईल. दुसरीकडे, एलडीएफचे संयोजक टीपी रामकृष्णन म्हणाले की हे काही नवीन नाही आणि सकाळी १० ते मध्यरात्रीच्या वेळेत बदल करण्याबाबत सरकारी धोरण आधीच अस्तित्वात आहे. सकाळी ११ ते रात्री ११ वाजेपर्यंत वेळ बदलली जात होती.

### हनी ट्रॅप संबंधात ४ जणांना अटक

**श्री विजया पुरम :** अंदमान आणि निकोबार बेटांवर एका व्यक्तीला हनी ट्रॅपमध्ये अडकवून त्याचे विवस्त्र छायाचित्र आणि व्हिडिओ वापरून पैसे उकळण्यासाठी ब्लॅकमेल केल्याच्या आरोपाखाली तीन महिला आणि एका पुरूषाला अटक करण्यात आली. ही व्यक्ती एका डेटिंग ॲपवरून एका महिलेच्या संपर्कात आली आणि तिला श्री विजया पुरममधील धनीखारी जंक्शनजवळील एका घरात कॉफीसाठी भेटण्यासाठी आमिष दाखवण्यात आले. त्याला औषधांनी भरलेले सॉफ्ट ड्रिंक देण्यात आले, ज्यामुळे तो बेशुद्ध झाला. दोन महिला आणि एक पुरूष यांनी त्याचे व्हिडिओ आणि फोटो काढल्याचे आढळले होते.

### ईएमयू ट्रेनचा डबा रुळावरून घसरला

**कोलकाता:** पश्चिम बंगालमधील हावडा येथील शालीमार स्टेशनवर प्रवेश करताना एका रिकाम्या ईएमयू ट्रेनचा एक डबा रुळावरून घसरला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. सकाळी १०.३० वाजता घडलेल्या या घटनेत कोणीही जखमी झाले नाही, असे त्यांनी सांगितले. टर्मिनल स्टेशनच्या प्लॅटफॉर्म ३ मध्ये प्रवेश करताना रिकाम्या रेकचा एक डबा रुळावरून घसरला, असे आग्नेय रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले.

## ३७ जागांसाठी १६ मार्चला निवडणूक; १० राज्यांत रिक्तता

# राज्यसभेला मिळणार नवे खासदार !

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुका १६ मार्च रोजी होणार असल्याची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. १० राज्यांतील सदस्यांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपत असल्याने या जागा रिक्त होत आहेत.

महाराष्ट्र, ओडिशा, तेलंगणा, तामिळनाडू, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, आसाम, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये राज्यसभेच्या जागा रिक्त होणार आहेत. त्यासाठीची अधिसूचना २६ फेब्रुवारी रोजी जारी करण्यात येणार असून त्याद्वारे निवडणूक प्रक्रियेला औपचारिक सुरुवात होईल.

नामांकन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च निश्चित करण्यात आली आहे. ६ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल, तर ९ मार्चपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. मतदान १६ मार्च रोजी होणार असून त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजल्यापासून मतमोजणी सुरू केली जाईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २० मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे आयोगाचे नियोजन आहे.

निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेबाबत विशेष सूचना जारी केल्या आहेत. मतपत्रिकेवर पसंती दर्शविताना केवळ आयोगाकडून उपलब्ध करून दिलेल्या एकात्मिक जांभळ्या रंगाच्या स्केच पेनचाच वापर करावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. अन्य कोणतेही लेखनसाहित्य वापरल्यास मत अमान्य ठरू शकते.

देशातील राज्यसभेची एकूण सदस्यसंख्या २४५ आहे. त्यापैकी २३३ सदस्यांची निवड अप्रत्यक्ष पद्धतीने होते, तर १२ सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते. राज्यसभेच्या निवडणुका सार्वत्रिक निवडणुकांप्रमाणे थेट मतदानाद्वारे होत नाहीत. संबंधित राज्यांतील निवडून आलेले आमदार मतदान करून राज्यसभेचे सदस्य निवडतात.

या निवडणुकीत ईव्हीएमचा वापर केला जात नाही. मतदानासाठी प्राधान्यक्रम पद्धतीचा अवलंब केला जातो. आमदार उमेदवारांच्या नावापुढे १, २, ३, ४ अशा क्रमाने पसंती दर्शवितात. विजयी होण्यासाठी आवश्यक मतसंख्या ठरावीक सूत्रानुसार निश्चित केली जाते. एकूण आमदारांची संख्या गुणिले १०० यास राज्यसभेच्या रिक्त जागा अधिक एक याने भागून त्यात एक मत अधिक जोडले जाते. त्या आधारे कोटा निश्चित होतो. राज्यसभेच्या या निवडणुकीकडे विविध राज्यांतील राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही लक्ष लागले आहे. आगामी निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात, यावर राज्यनिहाय राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातून निवृत्त होणाऱ्यांमध्ये शरद पवार, रामदास आठवले, फौजिया खान, रजनी पाटील, प्रियांका चतुर्वेदी, धैर्यशील पाटील आणि भागवत कराड यांचा समावेश आहे. रामदास आठवले यांची पुन्हा राज्यसभेवर निवड होण्याची शक्यता जवळपास निश्चित मानली जात आहे. मात्र, शरद पवार पुन्हा राज्यसभेत येणार की नाही, याकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे. पवार यांच्या निर्णयावर पुढील राजकीय समीकरणे अवलंबून राहतील, अशी चर्चा आहे. प्रियांका चतुर्वेदी आणि फौजिया खान यांच्या पक्षांकडे त्यांना पुन्हा राज्यसभेत पाठवण्यासाठी आवश्यक ते संख्याबळ नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे त्यांच्या पुनर्निवडीबाबत अनिश्चितता आहे. काँग्रेस नेत्या रजनी पाटील यांना इतर राज्यातून संधी मिळते का, याबाबतही तर्कवितर्क सुरू आहेत.

## हिंदू कुटुंबांनी तीन मुलांचा विचार करावा : मोहन भागवत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लखनौ :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मंगळवारी हिंदू समाजाने अधिक संघटित आणि जागरूक राहण्याचे आवाहन करत 'घरवापसी'च्या प्रयत्नांना गती देण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक हिंदू कुटुंबात किमान तीन मुले असावीत, असेही त्यांनी म्हटले.

येथील सरस्वती शिशु मंदिरात आयोजित सामाजिक सलोखा सभेत ते बोलत होते. हिंदू धर्मात पुनरागमनाचा पर्याय निवडणाऱ्यांना समाजाने पाठिंबा आणि संरक्षण द्यावे, असे त्यांनी नमूद केले. हिंदू समाजाने सतर्क राहणे आवश्यक असल्याचे सांगताना भागवत यांनी समुदाय अधिक सक्षम आणि संघटित व्हावा, असे प्रतिपादन केले. हिंदूंच्या घटत्या लोकसंख्येबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आणि जबरदस्तीने किंवा प्रलोभनांद्वारे होणाऱ्या धर्मांतराच्या घटनांकडे लक्ष वेधले. प्रत्येक हिंदू कुटुंबात किमान तीन मुले असावीत, असा आग्रह त्यांनी व्यक्त केला. काही शास्त्रज्ञांच्या मतांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, ज्या समाजांचा सरासरी प्रजनन दर प्रति कुटुंब तीन मुलांपेक्षा कमी असतो, त्या समाजांना लोकसंख्यात्मक आव्हानांचा सामना करावा लागतो. नवविवाहितांना किमान तीन मुलांचा संदेश दिला पाहिजे, असे ते म्हणाले. विवाह ही समाजरचना आणि सृष्टी टिकवण्याचे साधन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बेकायदेशीर घुसखोरीच्या मुद्द्यावर भाष्य करताना भागवत यांनी अशा घुसखोरांना शोधून काढून देशाबाहेर पाठवले पाहिजे, असे मत व्यक्त केले. त्यांना रोजगाराच्या संधी देऊ नयेत, असेही ते म्हणाले.

## परस्परसंमती संबंध हा बलात्कार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** विवाह अयशस्वी ठरल्यामुळे किंवा नातेसंबंध बिघडल्यामुळे संमतीने झालेले लैंगिक संबंध बलात्कार म्हणून गणले जाऊ शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल कोलकाता उच्च न्यायालय यांनी दिला आहे. सुरुवातीपासूनच फसवणुकीचा हेतू असल्याचे ठोसपणे सिद्ध झाले तरच 'लग्नाच्या खोट्या आश्वासनावर' आधारित बलात्काराचा गुन्हा ठरू शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती चैताली चॅटर्जी (दास) यांनी आरोपीविरुद्धचा खटला फेटाळून लावताना निरीक्षण नोंदवले की संबंधित प्रकरणात पुरुष आणि महिलेच्या वर्तनातून परस्पर संमती आणि सहकार्य स्पष्टपणे दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ नाते तुटल्यामुळे गुन्हा सिद्ध होत नाही. महिलेने असा आरोप केला होता की आरोपीने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि नंतर तिला गर्भपात करण्यास भाग पाडले.


न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की दोघांचे संबंध २०१७ मध्ये सुरू झाले आणि २०२२ पर्यंत ते कायम होते. या काळात ते एकत्र प्रवास करत होते, विविध ठिकाणी हॉटेलमध्ये थांबत होते आणि पती-पत्नीप्रमाणे राहत होते.

सुरुवातीपासूनच आरोपीकडे फसवणूक करण्याचा किंवा चुकीचा हेतू होता, हे दाखवणे आवश्यक आहे. उपलब्ध नोंदींनुसार, दोघांनी परस्पर संमतीने संबंध ठेवले असल्याचे दिसते. महिला गर्भवती राहिल्यानंतर दोघांच्या संमतीने गर्भपात करण्यात आल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने निरीक्षण केले की, जर सुरुवातीपासूनच फसव्या हेतूने संबंध प्रस्थापित झाले असते, तर तक्रार तत्काळ दाखल झाली असती. मात्र संबंधित महिला अनेक वर्षे संबंधात राहिली आणि कोणताही संशय व्यक्त झाल्याचे नोंदीत दिसत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

## बनावट मतदार नोंदणी; अधिकाऱ्यांवर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** बनावट मतदार नोंदणी प्रकरणी पश्चिम बंगाल सरकारने मंगळवारी दोन डब्ल्यूबीसीएस अधिकाऱ्यांसह चार सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल केला. भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या अंतिम मुदतीनंतर ही कारवाई करण्यात आली.

दक्षिण २४ परगणा आणि पूर्व मिदनापूर जिल्ह्यांतील बरुईपूर पूर्वा आणि मोयना विधानसभा मतदारसंघांमध्ये कार्यरत असलेले माजी निवडणूक नोंदणी अधिकारी (ईआरओ) आणि सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांनी गेल्या वर्षी बनावट मतदारांची नोंदणी केल्याचा आरोप आहे. भारतीय निवडणूक आयोग यांनी राज्याच्या मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती यांना १७ फेब्रुवारीपर्यंत अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा नोंदवण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

आयोग सध्या आसाम दौऱ्यावर असून परतल्यानंतर अहवालाची छाननी केली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यापूर्वी मुख्य सचिवांनी दिल्ली येथे आयोगाच्या पूर्णपीठासमोर हजर राहून निर्देशांची अंमलबजावणी उशिरा का झाली, याबाबत स्पष्टीकरण दिले होते. आयोगाच्या सूत्रांनी सांगितले की, केवळ एफआयआर दाखल करणे नव्हे तर यापूर्वी जारी करण्यात आलेल्या इतर निर्देशांची अंमलबजावणीही करण्यास सांगण्यात आले आहे.

दरम्यान, रविवारी रात्री निवडणूक आयोगाने पश्चिम बंगाल सिव्हिल सर्व्हिसचे सात सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी निलंबित केले. राज्यातील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेदरम्यान अपात्र व्यक्तींचा समावेश केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. तसेच, मतदार यादी पुनरावृत्तीच्या कामात निष्काळजीपणा केल्याच्या आरोपावरून तीन मतदार यादी सूक्ष्म निरीक्षकांनाही निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा नोंदणी निरीक्षकांच्या अहवालांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. मतदार यादीतील कथित अनियमितता लक्षात घेता आयोगाने कठोर भूमिका घेतली आहे.

## उत्तर प्रदेशात स्वबळावरच; मायावती यांचा खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लखनौ :** २०२७ मधील उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका इतर पक्षांसोबत आघाडी करून लढवण्याच्या बातम्या पूर्णपणे खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या असल्याचे बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्षा मायावती यांनी स्पष्ट केले. बसपा ही निवडणूक स्वतःच्या ताकदीवर लढवेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

पत्रकार परिषदेत बोलताना मायावती यांनी आरोप केला की, लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अशा अफवा पसरवल्या जात आहेत. "ही बातमी पूर्णपणे चुकीची, निराधार आणि बनावट आहे. जनतेची दिशाभूल करण्यासाठी जाणूनबुजून अशा चर्चा पसरवल्या जात आहेत," असे त्या म्हणाल्या. राजकीय नेत्यांनी आणि माध्यमांच्या काही घटकांनी अशा अटकळींना बळी पडू नये, असेही त्यांनी नमूद केले. बसपा स्वतंत्रपणे निवडणुका लढवणार असल्याची भूमिका आपण यापूर्वी अनेकदा स्पष्ट केली असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाचे संस्थापक कांशीराम यांच्या पुण्यतिथीनिमित्त ९ ऑक्टोबर २०२५ रोजी लखनौ येथे झालेल्या मेगा रॅलीतही यासंदर्भात स्पष्ट घोषणा करण्यात आल्याची आठवण त्यांनी करून दिली.

काही राजकीय पक्ष आणि माध्यमांतील घटक बसपाविरोधात दुर्भावनापूर्ण मोहिम राबवत असल्याचा आरोप करत मायावती म्हणाल्या की, काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि भारतीय जनता पक्ष यांची विचारसरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वांशी सुसंगत नाही. बसपासोबत आघाडीच्या चर्चा केवळ निवडणूक स्वार्थातून प्रेरित असल्याचा आरोप त्यांनी केला.

## पायजम्याची नाडी सोडणे म्हणजे बलात्काराचा प्रयत्नच

## न्यायालयांनी संवेदनशील व्हावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** महिलेला चुकीच्या पद्धतीने स्पर्श करणे आणि तिच्या पायजम्याची नाडी सोडणे हे कृत्य बलात्काराच्या प्रयत्नाच्या कक्षेत येते, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. तसेच न्यायालयांनी संवेदनशील व्हावे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. अलाहाबाद उच्च न्यायालयाने या प्रकरणात आरोपींच्या कृत्याला केवळ विनयभंग व बलात्काराची पूर्वतयारी मानले होते. तो निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने १७ मार्च २०२५ रोजी दिलेल्या निकालानंतर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. 'वी द वुमन' या स्वयंसेवी संस्थेने पत्राद्वारे आक्षेप नोंदवल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वेच्छा दखल घेतली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत दोन आरोपींवरील पोक्सो कायद्यान्वये 'बलात्काराचा प्रयत्न' हा आरोप पुन्हा कायम केला. निर्णय देताना खंडपीठाने नमूद केले की, लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांत केवळ तांत्रिक कायदेशीर विश्लेषणावर अवलंबून राहून चालणार नाही. न्यायाधीशांनी घटनात्मक आणि कायदेशीर तत्त्वांसह करुणा, सहानुभूती आणि सामान्य बुद्धीचा विचार करणे आवश्यक आहे. न्यायिक निर्णय हे मानवी संवेदनशीलतेचे प्रतिबिंब असले पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या त्या निरीक्षणाशी असहमती दर्शवली की आरोपींच्या कृत्यांतून बलात्काराचा स्पष्ट हेतू सिद्ध होत नाही. न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकारच्या कृत्यांचा वस्तुनिष्ठ विचार केल्यास ते केवळ पूर्वतयारी म्हणून पाहता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत मानवता आणि सामान्य ज्ञानाच्या आधारे निष्कर्ष काढले गेले पाहिजेत.

या प्रकरणात दोन आरोपींवर पिडितेला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केल्याचा आणि पायजम्याची नाडी सोडल्याचा आरोप आहे. लोक घटनास्थळी पोहोचल्याने आरोपी पळून गेले होते. या घटनेनंतर पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र उच्च न्यायालयाने या कृत्याला बलात्काराचा प्रयत्न मानण्यास नकार दिला होता.

लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणांत न्यायाधीशांनी अधिक संवेदनशील राहावे, यासाठी ठोस पावले उचलण्याचे निर्देशही दिले. भोपाळ येथील राष्ट्रीय न्यायिक अकादमीचे संचालक न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस यांना तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यास सांगण्यात आले आहे. ही समिती लैंगिक गुन्हे आणि इतर संवेदनशील प्रकरणांत न्यायालयीन प्रक्रियेत संवेदनशीलतेबाबत सर्वसमावेशक अहवाल सादर करणार आहे. न्यायव्यवस्थेत संवेदनशीलता रुजवणे आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून न्यायाधीशांना लिंगदृष्ट्या सजग करणे ही काळाची गरज असल्याचे खंडपीठाने अधोरेखित केले.

## आय-पॅक प्रकरणी न्यायालयात खडाजंगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राजकीय सल्लागार कंपनी आय-पॅकच्या कार्यालयावर आणि सह-संस्थापक प्रतीक जैन यांच्या पश्चिम बंगालमधील निवासस्थानी टाकलेल्या छाप्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात बुधवारी जोरदार युक्तिवाद झाला. तपास यंत्रणा आणि राज्य पोलिस यांच्यातील वाद न्यायालयापर्यंत पोहोचला असून, खंडपीठाने पुढील सुनावणी १८ मार्च रोजी ठेवली आहे.

अंमलबजावणी संचालनालय (ईडी) यांनी ८ जानेवारी रोजी आय-पॅकच्या कार्यालयावर छापा टाकला होता. कोळसा तस्करीशी संबंधित कथित कोट्यवधी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणातील हवाला व्यवहारांची चौकशी हा छाप्याचा मुख्य उद्देश असल्याचे ईडीचे म्हणणे आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ईडीने आपल्या याचिकेत आरोप केला की तपासादरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचल्या आणि तपास प्रक्रियेत अडथळा आणला.

सुनावणीदरम्यान, पश्चिम बंगालच्या एका पोलिस अधिकाऱ्याचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांनी ईडीचा 'शस्त्र म्हणून वापर' केला जात असल्याचा आरोप केला. यावर ईडीचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी प्रतिवाद करत तपास यंत्रणेलाच धमकावले जात असल्याचा दावा केला.

दरम्यान, ईडीने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, राज्याचे पोलिस महासंचालक आणि कोलकाता पोलिस आयुक्तांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे निर्देश देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. वैधानिक कर्तव्यात अडथळा आणल्याचा आरोप एजन्सीने आपल्या याचिकेत केला आहे.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात सर्व आरोप फेटाळले आहेत. ८ जानेवारी २०२६ रोजी प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी आणि विधाननगरमधील आय-पॅक कार्यालयात आपण गेलो होतो, तृणमूल काँग्रेसचा संवेदनशील राजकीय डेटा वापरला जात असल्याची माहिती मिळाली होती, असे त्यांनी नमूद केले आहे.

## आर्थिक फसवणूक बँक कर्मचाऱ्यांना अटक

**मिश्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या आर्थिक फसवणुकीप्रकरणी एचडीएफसी बँकेच्या पाच कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या आर्थिक गुन्हे शाखेने शोपियान आणि बडगाम जिल्ह्यात छापे टाकले, असे एजन्सीच्या प्रवक्त्याने सांगितले. अटक केलेल्या कर्मचाऱ्यांची ओळख आदिल अयुब गनई, इरफान मजीद जरगर, मुबाशिर हुसेन शेख, झैद मंजूर आणि जावेद अहमद भट अशी आहे.

## मणिशंकर अय्यर यांच्या वक्तव्यावरून राजकीय वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांच्या "मी राहुलवादी नाही" या वक्तव्यावरून बुधवारी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेसची पक्षाची घसरण राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली होत असल्याचा आरोप केला.

"गांधीवादी, नेहरूवादी, राजीववादी; पण राहुलवादी नाही," असे अय्यर यांनी म्हटल्याबाबत विचारले असता रिजिजू म्हणाले की, एकेकाळी परिपक्व आणि मजबूत नेतृत्व असलेली काँग्रेस आता राहुल गांधींसारखी झाली आहे. त्यांच्या सभोवतालचे नेतेही त्यांचेच अनुकरण करत असल्याचे त्यांनी म्हटले. सलग तीन निवडणुकांतील पराभवानंतरही त्याच नेतृत्वाला पुढे ठेवणे आश्चर्यकारक असल्याची टीका त्यांनी केली. केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अय्यर यांच्या वक्तव्यामुळे हा वाद निर्माण झाला आहे. अय्यर यांनी केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांच्या नेतृत्वाखालील डावे लोकशाही आघाडी पुन्हा सत्तेत येईल, असे भाकीत केले होते.

## लष्करी विश्लेषक टॉम कूपर यांचा खळबळजनक दावा

# पाकमधील अणुसुविधेवर भारतीय हवाई दलाचा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानमधील अलीकडच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एक वादग्रस्त आणि खळबळजनक दावा समोर आला आहे. प्रसिद्ध विमान वाहतूक इतिहासकार व लष्करी विश्लेषक टॉम कूपर यांनी ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील किराणा हिल्स येथील अणुसुविधेला लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. या दाव्याला समर्थन देणारे ठोस पुरावे आपल्या जवळ असल्याचा आग्रह त्यांनी धरला आहे.

माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत कूपर यांनी अधिकृत स्तरावर या दाव्याचा इन्कार करण्यात आला असला तरी आपली भूमिका कायम असल्याचे सांगितले. त्यांच्या मते, हल्ल्याची वेळ आणि पद्धत पाहता तो केवळ लष्करी कारवाई नव्हता, तर पाकिस्तानला धोरणात्मक संदेश देण्याचा प्रयत्न होता.

कूपर यांच्या म्हणण्यानुसार, किराणा हिल्ससारख्या ठिकाणी मर्यादित स्वरूपाचा हल्ला करून मोठे नुकसान न करता स्पष्ट इशारा देता येतो. भारताचा संदेश असा होता की, आवश्यक असल्यास पाकिस्तानच्या कोणत्याही महत्त्वाच्या स्थळावर अचूक आणि प्रभावी प्रहार करण्याची क्षमता भारताकडे आहे. हा हल्ला पाकिस्तानी नेतृत्वाला त्यांच्या मर्यादा दाखवून देण्यासाठी होता, असा त्यांचा दावा आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या काळातही कूपर यांनी सामाजिक माध्यमांवर यासंदर्भात भाष्य केले होते. त्यांनी भारतीय संरक्षण जनसंपर्क यंत्रणेवर टीका करत किराणा हिल्सजवळील कथित हल्ल्याची कबुली न दिल्याबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. हवाई दलाच्या पत्रकार परिषदेत व्हाईस एअर चीफ मार्शल नागेश कपूर यांना १० मे २०२५ रोजी झालेल्या ८८ तासांच्या संघर्षादरम्यान किराणा हिल्स येथील पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र साठवण सुविधांवर हवाई हल्ला झाल्याबाबत विचारण्यात आले होते. त्यावेळी कपूर यांनी असा कोणताही हल्ला झाल्याची माहिती नसल्याचे सांगितले होते. कूपर मात्र या स्पष्टीकरणावर समाधानी नाहीत. त्यांच्या मते, हल्ल्यानंतर लगेच झालेल्या राजनैतिक हालचालींकडे पाहिल्यास घटनांचा क्रम स्पष्ट होतो. पाकिस्तानने अमेरिकेसह भारताशी साधलेला संपर्क आणि युद्धबंदीबाबतची तत्परता या सर्वांचा एकत्रित विचार केला तर चित्र अधिक स्पष्ट होते, असे ते म्हणाले.

पुराव्यांबाबत बोलताना कूपर यांनी काही संकेतकांचा उल्लेख केला. त्यांच्या मते, संबंधित व्हिडिओंमध्ये टेकडीच्या दिशेने क्षेपणास्त्रांचे ट्रॅक दिसतात. तसेच पाकिस्तानी हवाई दलाच्या ४०९१ व्या स्क्वॉड्रनच्या रडार स्टेशन परिसरातून धुराचे लोट उठताना दिसत असल्याचा दावा त्यांनी केला. पाकिस्तानची प्रत्युत्तर देण्याची क्षमता कमी करण्यासाठी प्रथम रडार स्थानकांना लक्ष्य करण्यात आले आणि त्यानंतर भूमिगत साठवण सुविधांच्या प्रवेशद्वारांवर प्रहार करण्यात आला, असे ते म्हणाले.

किराणा हिल्सचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करताना कूपर यांनी सांगितले की हे ठिकाण पाकिस्तानच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित असून ते अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे या स्थळावर कारवाई झाल्याचा दावा लष्करी आणि राजनैतिक दोन्ही पातळ्यांवर गंभीर परिणाम करणारा ठरू शकतो.